# प्रसिध्दी पत्रक

दि. २० /०४/२०२३

कृषी विभागातील कृषी आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील लघुटंकलेखक, लघुलेखक (निम्न श्रेणी), लघुलेखक (उच्च श्रेणी) या पदांसाठी जाहिरात ( क्र. १/२०२३) दिनांक ६.४.२०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

तसेच वरिष्ठ लिपीक व सहाय्यक अधिक्षक संवर्गातील सरळसेवा भरतीच्या विभागनिहाय जाहिराती [जाहिरात क्र. ११०१/२०२३ (वि.कृ.स.सं. कोल्हापूर), २४८८/२०२३ (वि.कृ.स.सं. नाशिक), २/२०२३ (वि.कृ.स.सं. नागपूर), ०१/२०२३ (वि.कृ.स.सं. औरंगाबाद), २१२५/२०२३ (वि.कृ.स.सं. ठाणे), १२७३/२०२३ (वि.कृ.स.सं. अमरावती), १९४२/२०२३ (वि.कृ.स.सं. लातूर), २०६५/२०२३ (वि.कृ.स.सं. पुणे)] कृषी विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द झालेल्या असून त्यानुसार सदर परीक्षेसाठी आवेदन पत्र भरणेची मुदत दि. २०.०४.२०२३ रोजी पर्यंत ठेवण्यात आली होती.

ऑनलाईन अर्ज संख्या व अर्ज करण्यासाठी उमेदवारांकडून उपस्थित होणाऱ्या शंका विचारात घेऊन आवेदन पत्र व परीक्षा शुल्क भरण्याची मुदत दि. ३०.०४.२०२३ रोजी रात्री २३.५९ पर्यंत वाढविण्यात येत आहे. कृपया उमेदवारांनी याची नोंद घ्यावी.

जे उमेदवार एकापेक्षा जास्त पदांसाठी आवश्यक अर्हता धारण करीत आहेत त्यांनी प्रत्येक पदासाठी स्वतंत्रपणे अर्ज करावा. सुधारित अंतीम दिनांकापर्यंत प्राप्त अर्जांची संख्या व आवश्यक शैक्षणिक अर्हता विचारात घेऊन समान शैक्षणिक अर्हता असणाऱ्या पदांचा गट करून त्या पदांसाठी एका किंवा एकापेक्षा जास्त सत्रांमध्ये परीक्षा घ्यावयाची याबाबतचा निर्णय घेण्यात येईल.

सुनील चव्हाण भाप्रसे 20/4/2023
आयुक्त कृषी
महाराष्ट्र राज्य,पुणे